प्रति,

प्राचार्य

-------------

-------------

विषय :- रा.से.योजना कार्यक्रम अधिकारी यांना प्रमाण पत्र मिळणे बाबत.......

मा. महोदय/महोदया,

रा.से.योजना अंतर्गत महाविद्यालयीन रा.से.योजना विभागामध्ये कार्यक्रम अधिकारी वर्षभर कार्य करीत असतात. महाविद्यालय/विद्यापीठ/दत्तक गांव/वस्ती/इत्यादी पातळीवर विद्यार्थी स्वयंसेवकांच्या माध्यमातून विविध समाज उपयोगी उपक्रम राबविले जातात. त्या बरोबरच ७/१० दिवसांचे विषेश निवासी शिबिर देखील आयोजीत करीत असतात. सदर कार्यक्रम अधिका-यांनी दिलेल्या योगदाना बद्दल त्यांना विद्यापीठातर्फे प्रमाण पत्र देऊन गौरविण्यात यावे असे विद्यापीठ रा.से.योजना सल्लागार समीती मध्ये ठरविण्यात आले. त्यानुसार महाविद्यालयांतून माहिती मागविण्यासाठी एक नमुना तयार करून सदर नमुना विद्यापीठ रा.से.योजना सल्लागार समीती कडून मंजूर करण्यात आला.

सदर नमुन्या विषयी फेब्रुवारी २००९ मध्ये झालेल्या कार्यक्रम अधिका-यांच्या आढावा बैठकीत चर्चा करण्यात आली.

स्वयंसेवक नोंदणी /१२० तासांची पुर्तता /२४० तासांची पुर्तता/विशेष शिबिर / ओरीयंटेशन/ रिफ्रेशर/राज्य व राष्ट्रीय स्तरावरील सहभाग /इतर उल्लेखनिय कार्य इत्यादी विषयांच्या निकषांवर प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आपणांस विनंती करण्यात येते की सोबत जोडलेल्या रकान्यात योग्य ती माहीती भरून विद्यापीठ रा.से.यो. विभागात २५ /०६/२००९ तत्पुर्वी पाठविण्यात यावी.

धन्यवाद

आपला विश्वासू,

प्रो. अतुल हं. साळुंके,

प्रभारी कार्यक्रम समन्वयक,रासेयो.

सोबत :- वरील प्रमाणे